

कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित

# संगमेश्वर कॉलेज सोलापूर

# प्रतिभासंगम



वर्ष दुसरे । अंक ४ था । जानेवारी – मार्च २०२०

**श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...**
**संगमेश्वर कॉलेज,सोलापूर**



प्रेरणास्थान


# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती –**
प्राचार्य डॉ.शोभा राजमान्य
उपप्राचार्य आनंद हुली
प्रा. एस .जे.आवटे
प्रा.दीपक पाटील
प्राचार्य गायत्री कुलकर्णी

**मुखपृष्ठ –** सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी –** प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक -**
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई-मेल –**
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in


## संपादकीय ...

'प्रतिभासंगम'चा चौथा अंक दिवाळीनंतरच्या दुसऱ्या सत्रातील घडामोडींचा सोबत आपल्या भेटीला येत आहे. राज्यस्तरावरील आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या क्रीडा ज्योतीचे संगमेश्वरमध्ये जंगी स्वागत झालं. एनसीसीच्या विद्यार्थ्यांचं तसेच सर्वच विभागातील विद्यार्थ्यांनी यामध्ये उस्फुर्त सहभाग नोंदवला. पुणे विभागीय शालेय बेसबॉल स्पर्धा कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीनिमित्त झाल्या. चित्रकला महाविद्यालयाने आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार भगवान रामपुरे यांच्या उपस्थितीत सागर रामपुरे यांचे शिल्प प्रात्यक्षिक घेतले. विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाच्या बक्षीस वितरणाचा वृत्तांत विज्ञान प्रेमींसाठी वाचनीय आहे. वाणिज्य क्षेत्रातील सॉफ्ट स्किल विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतात असा मोलाचा संदेश माजी महापौर किशोर देशपांडे यांनी दिला. त्यांच्या उपस्थितीत ई-बँकिंग प्रशिक्षण प्रमाणपत्राचे ही वितरण झाले. जिल्हा ग्राहक मंचच्या सहकार्याने एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा झाली यात न्यायमूर्ती ए.सी.भैसरे यांनी प्रबोधनपर विचार व्यक्त केले.

जानेवारीत समस्त सोलापूरकरांना ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर यांच्या यात्रेचे वेध लागतात याचे औचित्य साधून सोलापुरी खाद्यसंस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या उद्योमोदय या खाद्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. जनसंवाद व पत्रकारिता विभागाच्यावतीने माध्यमविद्या या अंकाचे प्रकाशन झाले. जेईई परीक्षेचा निकाल, जाहिरात शब्दकोडे स्पर्धा यांचे सचित्र वृत्तांत संस्था राबवत असलेल्या उपक्रमाचे सकारात्मक प्रतिबिंब उमटवते. आमच्या पब्लिक स्कूलच्या चिमुकल्यांनी "दान दिल्याने ज्ञान वाढते, त्या ज्ञानाचे मंदिर हे" या 'उक्तीप्रमाणे आपलं' घर नळदुर्ग या प्रकल्पाला आपलेसे करत मदतीचा हात दिला. ६७ व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी मार्गदर्शन केले, तर संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या प्राथमिक विभाग स्नेहसंमेलनात समुपदेशक कमल शाह यांनी विद्यार्थी- पालकांशी संवाद साधला. हायस्कूल विभागाच्या स्नेहसंमेलनात डॉ.उमा प्रधान यांनी संबोधित केले. सॅन उत्सवात तरुणाईचा सळसळता उत्साह पहावयास मिळाला. राज्यस्तरीय सतरावे विद्यार्थी इतिहास परिषदेचे अधिवेशन शिवचरित्रकार डॉ.शिवरत्न शेटे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. आदरणीय मेघराज काकांच्या पुण्यतिथी निमित्त बाळासाहेब भोगडे यांनी त्यांच्या सहवासातील आठवणींना उजाळा दिला. कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जयंती आणि कर्मयोगी आप्पासाहेब यांची पुण्यतिथी मराठी विभागाने ग्रंथ प्रदर्शन भरवून या विभूतींच्या प्रेरक कार्याची ओळख करून देत साजरी केली. राष्ट्रीय स्तरावरील ललित कला अकादमी पुरस्कार चित्रकला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी तेजस्विनी सोनवणे यांना मिळाला.हा पुरस्कार भारताचे महामहिम माननीय राष्ट्रपती श्री रामनाथ कोविंद यांच्या हस्ते ललित कला अकादमीच्या ६१ व्या वार्षिक सोहळ्यात सन्मानपूर्वक प्रदानकरण्यात आला.ही नोंद समस्त सोलापूरकरांसाठी आणि संगमेश्वर शिक्षण संस्थेसाठी अभिमानाची,आनंददायी आणि अभिमानाची आहे.

या वैशिष्टपूर्ण घटना,घडामोडी संगमेश्वर कॉलेजच्या लौकिकात भर घालणाऱ्या ठरल्या. डिजिटल तंत्राच्या वाटेवरील प्रवास जागोजागी अधोरेखित करण्याचा प्रयत्न संपादक मंडळाने केला आहे. आपल्या मार्गदर्शनीय सूचनांचे आम्ही मन:पूर्वक स्वागत करतो.

# आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या ज्योतीचे संगमेश्वर मध्ये जंगी स्वागत



आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेच्या ज्योतीचे संगमेश्वर मध्ये जंगी स्वागत करताना विद्यार्थी प्राध्यापकवृंद

**सोलापूर (दिनाक २४ )**
**क्रीडा प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या तेविसाव्या आंतरविद्यापीठीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या ज्योतीचे आणि रॅलीचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या संगमेश्वर कॉलेज च्या वतीने जंगी स्वागत करण्यात आलं. दिनांक 26 ते 30 डिसेंबर या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या वतीने आंतरविद्यापीठीय या स्पर्धा विद्यापीठाच्या भव्य मैदानावर संपन्न होणार आहेत. त्या निमित्ताने राज्याचे महामहीम राज्यपाल भगतसिंग कोषारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

प्रारंभी राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध पथसंचलनात रॅलीचे स्वागत कॉलेजच्या मैदानावर झाले. तत्पूर्वी कॉलेजच्या मुख्य इमारतीच्या समोरून प्राचार्य शोभा राजमान्य यांच्यासह सर्व प्राध्यापकांनी खेळाडूंचे स्वागत केले. मुख्य मैदानावर झालेल्या कार्यक्रमात जिमखाना विभाग प्रमुख प्राध्यापक आनंद चव्हाण यांनी प्रास्ताविक केलं. त्यानंतर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव प्राध्यापक शिवाजी शिंदे यांनी आपल्या मनोगतात विद्यापीठाने आयोजित केलेल्या या या आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेची रूपरेषा सांगितली. त्यानंतर क्रीडाज्योत आणि रेलीचे समन्वयक प्राध्यापक सचिन गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करत या स्पर्धांचा हेतू सांगितला. कॉलेजच्या वतीने प्राचार्य शोभा राजमान्य आणि रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संजय आवटे यांनी शुभेच्छा दिल्या. एनसीसीच्या वतीने सुभेदार जितबहादुर बुरुंग यांनी शुभेच्छा दिल्या आणि क्रीडा ज्योती सन्मानाने मार्गस्थ झाली .



**विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव प्रा.डॉ. शिवाजी शिंदे यांनी रूपरेषा सांगताना**

या शुभेच्छा कार्यक्रमाचं सूत्रसंचालन संतोष पवार आणि शिवराज पाटील यांनी केलं . संतोष खेंडे यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डी.एम. मैत्री, वंदना पुरोहीत, उपप्रचार्य आनंद हुली,पर्यवेक्षक प्रसाद कुंटे,आर. व्ही. देसाई, सुहास पुजारी, महादेव देशमुख, सारीपुत्र तुपेरे, ऋतुराज बुवा, मंगलमूर्ती धोकटे ,नंदा साठे ,उषा जमादार ,अर्जुन धोत्रे, राजकुमार मोहोरकर, बी. बी. पुजारी, शिवाजी मस्के, विष्णू विटेकर, संघप्रकाश दुडे, सुनील सोनटक्के, संतोष कुलकर्णी, शरण वांगी आणि विक्रांत विभुते यांच्यासह प्राध्यापक मंडळी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**जिमखाना विभाग प्रमुख प्राध्यापक आनंद चव्हाण यांनी प्रास्ताविक केलं**

# पुणे विभागीय शालेय बेसबॉल स्पर्धेचे उद्घाटन

## संगमेश्वरला क्रीडा विभागाची समृद्ध परंपरा आहे –सीए विनोद भोसले



**सोलापूर (क्रीडा प्रतिनिधी)**
" संगमेश्वर कॉलेजची क्रीडाक्षेत्रातीलन परंपरा उत्तुंग आहे. वंदना शानभाग पासून ते आत्ताच्या अनघा देशपांडे यांच्यापर्यंत ही परंपरा सतत कायम सुरु आहे .वेगवेगळ्या प्रकारच्या माध्यमातून संगमेश्वर कॉलेज अग्रेसर असतं म्हणून यंदाच्या वर्षी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे जनरल चॅम्पियनशिप देखील कॉलेजला मिळालं याचं सारं श्रेय इथल्या क्रीडा विभागाला आहे. या क्रीडा विभागात खेळणाऱ्या सर्व खेळाडूंचे  हे परिश्रम आहे.  सिद्धरामेश्वर यांच्या पुण्यभूमीत विभागीय स्पर्धा होतात याचा सन्मान आमच्या सोलापूरकरांना मिळाला याचा आनंद आहे.इथे उपस्थित सर्व खेळाडूंचा आम्ही सोलापूरकरांच्या वतीने हार्दिक स्वागत करतो आणि त्यांच्या पुढच्या कारकिर्दीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो"

कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी यांच्या 110 व्या जयंतीनिमित्त जिल्हा  क्रीडाधिकारी कार्यालय, संगमेश्वर कॉलेज आणि सोलापूर शहर आणि जिल्हा बेसबॉल असोसिएशन च्या वतीने पुणे विभागीय शालेय बेसबॉल स्पर्धेचे उद्घाटन संगमेश्वर कॉलेजचे माजी विद्यार्थी सीए नगरसेवक विनोद भोसले यांच्या शुभहस्ते झाले. याप्रसंगी भोसले बोलत होते.प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य यांच्याअध्यक्षतेखाली आणि क्रीडा कार्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक जरार कुरेशी यांच्या उपस्थितीत हा उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला.या स्पर्धेसाठी सचिव धर्मराज काडादी , क्रीडाप्रेमी आणि प्राध्यापक शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या



*जिल्हा क्रीडा कार्यालयाचे जरार कुरेशी म्हणाले की,* "खेळाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाचा विकास होतोच विशेष म्हणजे जीवनातल्या कोणत्याही समस्यांना सामोरे जात असताना क्रीडापटू कधीही निधड्या छातीने पुढे जातो.याचे सगळे बाळकडू या मैदानावर मिळतात म्हणून आपण या खेळांमध्ये सहभागी झालात आणि वेगवेगळ्या क्रीडाप्रकार प्रकारातूनच सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो तुम्हा सगळ्यांना हार्दिक शुभेच्छा.

याप्रसंगी उपप्राचार्य आनंद हुली क्रीडाशिक्षक मुख्याध्यापक राजाराम शितोळे , अहमदनगरचे सचिव कल्पेश भागवत, पुणे जिल्ह्याचे रोहित ठाकूर, प्रा. शिवराज पाटील प्रा. संतोष पवार आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेचे संपूर्ण संयोजन संगमेश्वर महाविद्यालय क्रीडा शिक्षक प्राध्यापक संतोष खेंडे करीत आहेत .या स्पर्धेसाठी पंच म्हणून सागर जगझाप, महादेव वाघमारे, आकाश मेत्रे, मनिष बिराजदार हे काम पाहत आहेत .या उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन प्राध्यापक संतोष खंडे यांनी केले तर आभार शिवराज पाटील यांनी मानले. आणि सामन्यांना प्रारंभ झाला.



# सागर रामपुरे यांनी साकारले अध्यात्मिक गुरु स्वामी जीवनउत्सव यांचे शिल्प

## कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचा उपक्रम






**सोलापूर (दिनांक १७)** अध्यात्मिक गुरु स्वामी जीवन उत्सव यांचे मंद बासरीचे सूर... अल्हाददायक गुलाबी थंडीच्या प्रसन्न सकाळी.... संगमेश्वर कॉलेजच्या प्रांगणात संपन्न झाले आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार भगवान रामपुरे यांचे चिरंजीव सागर रामपुरे यांचे शिल्प प्रात्यक्षिक. प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार भगवान रामपुरे यांना निमंत्रित करण्यात आलं होतं. संगमेश्वर कॉलेजच्या कै. कर्मयोगी अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाच्या प्रांगणात. प्रारंभी अप्पासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी मंचावर कला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील,अध्यात्मिक गुरु स्वामी जीवनउत्सव आदी मान्यवर उपस्थित होते.






**प्राचार्य दीपक पाटील यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या कार्यक्रम प्रसंगी याप्रसंगी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार भगवान रामपुरे , सागर रामपुरे, अध्यात्मिक गुरु स्वामी जीवनउत्सव उपस्थित होते.**

प्राचार्य दीपक पाटील आपल्या प्रास्ताविकात या शिल्प प्रात्यक्षिक याविषयी सविस्तर माहिती देत ते म्हणाले, "अशा उपक्रमातून कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दृष्टी तयार झाली पाहिजे हा एकमेव हेतू या मागे आहे."

सागर रामपुरे यांनी आपल्या मार्गदर्शना मध्ये विद्यार्थ्यांना शिल्पकलेतील बारकावे सांगत शिल्पकलेचा प्रवास ,त्याचा इतिहास, रामपुरे कुटुंबीयांनी यामध्ये घातलेली भर याविषयी संवाद साधत कलेचे हे बाळकडू लहानपणापासून बाबांकडून मिळाले असे प्रामाणिकपपणे नमूद करत पप्रेरणा दिली. आपला जीवनानुभव सविस्तर विद्यार्थ्यांसमोर मांडला.

याप्रसंगी प्रा. डॉ. सुहास पुजारी,डॉ. बी. बी. पुजारी, आकाश गोरे, चित्रकार हेमंत कपुरे, शिल्पकार नितीन जाधव, विठ्ठल मोरे , प्रा. मीनाक्षी रामपुरे यांच्यासह चित्रकला महाविद्यालयातील विद्यार्थी आणि संगमेश्वर कॉलेज आवारातील प्राध्यापक मंडळी उपस्थित होती.रेखा पटणे यांनी सूत्रसंचालन केले तर सचिन गायकवाड यांनी आभार मानले.



**कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयात शिल्पकलेचे प्रात्याक्षिक झाले त्याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी वर्ग.**

# विज्ञान प्रकल्प प्रदर्शनातून संशोधनाची दृष्टी मिळते.

**- सी. बी. नाडगौडा**

## संगमेश्वरच्या हर्षाली टोणपे, समीक्षा माने यांचे विज्ञान प्रकल्प प्रथम तर वॉलचंदच्या दर्शन गांधी, अरिहंत अगरखेड यांचे द्वितीय



सोलापूर ( दिनांक २१ ) "विज्ञान प्रकल्प प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना आपल्या कल्पनांचं सादरीकरण कौशल्य मिळवता येतं. मिळवलेल्या ज्ञानाला खऱ्या अर्थाने वापरता येतं. त्यातूनच नावीन्यपूर्ण मॉडेल्स विद्यार्थी बनवतात. वैज्ञानिक दृष्टिकोनाचे प्रकटीकरण विज्ञान प्रकल्प प्रदर्शनातून होते. असे उपक्रम कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर झाले तर विज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या नक्कीच वाढेल.कॉलेजचे हे काम नक्कीच कौतुकास्पद आहे . **विज्ञान प्रकल्प प्रदर्शनातून संशोधनाची दृष्टी मिळते. असे सी. बी. नाडगौडा म्हणाले.**

ते संगमेश्वर कॉलेजच्या वतीने आयोजित केलेल्या विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी बोलत होते. मंचावर कॉलेजच्या संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य,उपप्रचार्य श्रीनिवास गोटे , उपप्राचार्य आनंद हुली , पर्यवेक्षक प्रसाद कुंटे,विज्ञान विभाग प्रमुख प्रमोद उडगीकर आदी मान्यवर उपस्थित होते



.

सुरुवातीला प्रास्ताविक एम. आर. वाली यांनी केले तर आर. एफ. डोंगरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यानंतर प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.परीक्षकांच्या वतीने प्राध्यापक धनंजय शहा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये त्यांनी या प्रदर्शनातील वेगवेगळ्या प्रकल्पांचा आढावा घेत विद्यार्थ्यां मधली शोधक वृत्ती आम्हाला प्रेरित करून गेली असे प्रामाणिकपणे नमूद केले.आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी यांनी कॉलेजने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे महत्त्व सांगितले. सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानत त्यांना प्रोत्साहित करून शुभेच्छा दिल्या.




**संगमेश्वर कॉलेजच्या वतीने आयोजित  विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी  डॉ. सी. बी. नाडगौडा,श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य मा.पुष्पराज काडादी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, उपप्राचार्य श्रीनिवास गोठे , उपप्राचार्य आनंद हुली, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे व मान्यवर**

**निकाल**

हर्षाली टोणपे, समीक्षा माने (प्रकल्प – स्मार्ट डस्टबिन– प्रथम क्रमांक – संगमेश्वर कॉलेज),दर्शन गांधी, अरिहंत अगरखेड (प्रकल्प –ऑब्स्टॅकल अव्हाॅन्डिंग रोबोट – द्वितीय क्रमांक – वालचंद कॉलेज), शिवम शहापुरे ,अथर्व भूटे ( प्रकल्प – ऑइल स्पिल प्रिव्हेनटेशन – तृतीय क्रमांक – ए . डी. जोशी जुनियर कॉलेज),उत्तेजनार्थ बक्षिसे – राजश्री चाटी, साक्षी अथणीकर

( रिफ्लेक्शन ऑफ साउंड वेव्ह – संगमेश्वर कॉलेज) रोशन मेरगू ,आदर्श माला ( एच टू गन – कुचन ज्युनिअर कॉलेज) किरण भरले, चैतन्य तुपारे( पायथागोरस थेरम – संगमेश्वर कॉलेज) मेघा सुरवसे, ऋषिकेश शिव शेट्टी, अनिकेत फताटे( अपार्टमेंट फार्मिंग –संगमेश्वर कॉलेज) भाऊसाहेब गोरंटी, ऋषिकेश कुलकर्णी ( सेरिकल्चर– वालचंद कॉलेज) रश्मी मोहोळकर, अभिषेक बंडा ( डोमेस्टिक वेस्ट ट्रीटमेंट प्लांट– वालचंद कॉलेज) मंदार मंद्रुपकर,अथर्व जाधव, साईनाथ तानवडे श्री उंडाळे( हिट सेन्सर विथ कूलिंग – संगमेश्वर कॉलेज) साक्षी चिंचोळकर,प्रेरणा जाधव (बिलिंग ॲप्लिकेशन – संगमेश्वर कॉलेज) वैभव कुलकर्णी, विघ्नेश येमूल (ऑटोमॅटिक पंचिंग मार्किंग मशीन – नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालय)






**परीक्षक** म्हणून प्रा.धनंजय शहा, दत्तकुमार म्हमाणे, एम. आय. बेळे, आय .आय.मुजावर, व्ही. आर.व्हटकर, एम. एम.अडवानकर यांनी काम पाहिले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लीना खमितकर यांनी केले तर आभार रुपाली अंबुलगे यांनी मानले. या प्रसंगी प्रा. रामभाऊ राठोड, नागेश कोल्हे, सुभाष पाटील, बी. एम. कापसे,आर. पी कुलकर्णी, एस. पी. कुलकर्णी,एस. एन. विजापुरे, प्रशांत पाटील ,अभिजित निवर्गीकर, प्रियांका पाटील,शिल्पा लब्बा,स्मिता शिंदे , प्राजक्ता चव्हाण, सुषमा पाटील, बाबुराव रणे ,चंद्रकांत हिरतोट, प्रशांत शिंपी ,विश्वजित आहेरकर,एस. बी. निंबर्गी,शिवराज पाटील, संतोष पवार, विशाल जत्ती, मानसी काळे ,स्नेहल खैरे, अश्विनी वाघमारे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी , स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते



**संगमेश्वर कॉलेजच्या वतीने आयोजित विज्ञान प्रकल्प प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी विजेते विद्यार्थी आणि पालक वर्ग**

# वाणिज्य शाखेतील ज्ञानाबरोबर बँकिंगमधील सॉफ्ट स्किल शिका – किशोर देशपांडे

## संगमेश्वर कॉलेजमध्ये बँकिंग प्रशिक्षण प्रमाणपत्रांचे वितरण




सोलापूर (दिनांक २८)

वाणिज्य शाखेतील अभ्यासाबरोबरच प्रत्यक्ष कामांचा देखील आपल्याला ज्ञान असले पाहिजे यासाठी बँकिंग क्षेत्रातील सॉफ्ट स्किल शिकलो तरच आपण येणाऱ्या भविष्यकाळात स्पर्धेला सामोरे जाऊ शकतो असे प्रतिपादन सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी महापौर किशोर देशपांडे यांनी केले ते संगमेश्वर कॉलेजमध्ये बँकिंग प्रशिक्षण प्रमाणपत्रांच्या वितरण कार्यक्रम प्रसंगी बोलत होते मंचावर जनरल मॅनेजर सदानंद बीड, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, उपप्राचार्य आनंद हुली, वाणिज्य विभागाचे प्रभाकर नागणसूरे, मल्लिनाथ साखरेआदी उपस्थित होते.

प्रारंभी सरस्वतीपूजन झाले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा कॉलेजच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्राध्यापक बाबासाहेब सगर यांनी करून दिला. प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांचे मनोगते झाली त्यानंतर त्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.









त्यानंतर बोलताना किशोर देशपांडे म्हणाले की ''अनुभवातून व्यक्ती समृद्ध होते त्यातूनच वाणिज्य शाखेतील प्रात्यक्षिक कार्य महाविद्यालयीन जीवनात आपल्याला मिळते. ते खूप महत्त्वाचे आहे. सार्वजनिक जीवनात स्किल्ड व्यक्तींना खूप महत्त्व आहे. येणाऱ्या काळात व्यक्तीच आपलं जीवन समृद्ध करायला करू शकतो. याचे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी आपण प्रयत्नशील होणे गरजेचे आहे. भविष्य घडवायचे असेल तर वेगवेगळ्या क्षेत्रातील आव्हाने स्वीकारून आपण त्यातील बारकावे शिकावे. असेही ते म्हणाले. अध्यक्षीय मनोगतात पुष्पराज काडादी यांनी कॉलेजने आयोजित केलेल्या अशा उपक्रमांचा आढावा घेत, येणाऱ्या काळात संगमेश्वर कॉलेज कशा पद्धतीने स्वतंत्र अभ्यासक्रमाच्या पद्धतीकडे वाटचाल करत आहे, याची माहिती दिली. याप्रसंगी वाणिज्य विभागाचे बसय्या हणमगाव, संतोष पवार, राज मळेवाडी, रविन बिराजदार, निनाद सपकाळ, सारिका वरवडकर यांच्यासह विद्यार्थी प्राध्यापक मंडळी उपस्थित होती. संगीता म्हमाणे यांनी सूत्रसंचालन केले तर रूपाली पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.





# न्याय मिळवून देण्यासाठी ग्राहक मंच तत्पर आहे
# - न्या. ए. सी. भैसरे
# संगमेश्वरमध्ये एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

सोलापूर (प्रतिनिधी)
'' व्यावहारिक जीवनात वावरताना ग्राहकांनी अधिक सजगतेने आणि काळजीने व्यवहार करावेत. अनावधानाने जर फसवणूक झाली तर ग्राहक मंचाकडे बिनधास्त तक्रार करावी. न्याय मिळवून देण्यासाठी ग्राहक मंच तत्पर आहे. असे प्रतिपादन जिल्हा ग्राहक मंचचे अध्यक्ष तथा जिल्हा ग्राहक न्यायालयाचे न्या. ए. सी. भैसरे यांनी केलं. ते वाणिज्य व व्यवस्थापन विभाग संगमेश्वर कॉलेज आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संगमेश्वर मध्ये 'ग्राहक संरक्षण कायदा आणि इथिकल मार्केटिंग' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा झाली. यामध्ये 169 जणांनी सहभाग नोंदवला. याप्रसंगी मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य प्रा. ज्योती काडादी, विधीज़अमित आळंगे, संदीप जव्हेरी, प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य आदी मान्यवर उपस्थित होते.











प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलित करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा व वक्त्यांचा कॉलेजच्या वतीने सत्कार झाला. प्रास्ताविक वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्य प्रा. वंदना पुरोहित यांनी केलं. ए. सी. भैसरे पुढे म्हणाले की,'' ग्राहकांनी त्यांचे हक्क मिळवण्यासाठी ग्राहक मंचचा आधार जरुर घ्यावा. मात्र फसवणूक होणार नाही यासाठी आपलीही काही जबाबदारी असते कर्तव्य असतात त्याकडेही ग्राहकांनी लक्ष द्यावे.विधिज्ञ अमित आळंगे यांनी आपल्या वकिली क्षेत्रातील वैविध्यपूर्ण अनुभव सांगत म्हणाले की,'' ग्राहक हक्कांच्या प्रती जागृती होणे गरजेचे आहे. घाईगडबडीत निर्णय मोठी संकटे निर्माण करतात. तेव्हा ग्राहकांनी आपल्या कर्तव्याची जबाबदारी विसरून नयेत ''. जव्हेरी ॲडव्हर्टायझिंगचे संदीप जव्हेरी म्हणाले की, '' सध्याचे युग हे जाहिरातींचे आहे. मात्र खोट्या जाहिरातींना भुलून न जाता विवेकबुद्धी जागृत ठेवून व्यावहारिक जीवनात आपण वावरले पाहिजे. ग्राहकांना आकर्षित करणे हे जाहिरात कंपनीचे काम आहे. तरी सत्य पडताळून पाहणार शेवटी ग्राहकाचे काम आहे.'' या दोन सत्रातील चर्चासत्रात वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. कार्यशाळा यशस्वीतेसाठी प्रा. राजकुमार खिलारे,प्रा.गौरव जुगदार प्रा. निखिल काळे प्रा.नम्रता माने यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन पल्लवी बिरादार हिने केले तर प्रा. अर्जुन चौधरी यांनी सर्वांचे आभार मानले.



# उद्योगातील जोखीम पत्करल्यानंतरच उद्योग यशस्वी होतो –डॉ. मृणालिनी फडणवीस

## संगमेश्वरध्ये 3 दिवसिय 'उद्यमोदय' खाद्यमेळ्याचे आयोजन

सोलापूर ( दिनांक 10 )
उद्योग विश्वात यशस्वी झालेल्या उद्योजक यांची जीवनगाथा पाहिली की लक्षात येते की त्यांनी या क्षेत्रात जोखीम पहिल्यांदा पत्करली म्हणून ते पुढच्या आयुष्यात यशस्वी झाले. म्हणून विद्यार्थ्यांनो जोखीम पत्करायला शिका. असा सल्ला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर मृणालिनी फडणवीस यांनी दिला. ते संगमेश्वर कॉलेज वाणिज्य व व्यवस्थापन विभाग उद्योजकता विकास मंडळ यांच्यावतीने आयोजित स्टुडन्ट सिनर्जी एक्सपो 2020 या उद्यमोदय या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी मंचावर कामिनी गांधी, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य शोभा राजमान्य, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य डॉक्टर वंदना पुरोहित उपस्थित होते.






**संगमेश्वर कॉलेज वाणिज्य व व्यवस्थापन विभाग उद्योजकता विकास मंडळ यांच्यावतीने आयोजित स्टुडन्ट सिनर्जी एक्सपो 2020 या उद्यमोदय या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी याप्रसंगी मंचावर कामिनी गांधी, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य शोभा राजमान्य, कॉमर्स विभागाच्या उपप्राचार्य डॉक्टर वंदना पुरोहित**

कुलगुरू पुढे म्हणाल्या की,' कॉलेज जीवनात अशा उद्योग विश्वाशी निगडित स्पर्धांचे आयोजन केल्याने मुलांचा दृष्टिकोन तयार होतो. व्यक्तिमत्व घडते. निकोप स्पर्धेत आपल्याला वावरता येतं. मार्केटिंग शिकता येतं. स्पर्धात्मक वातावरणाचा सामना करण्याचे बळ मिळतं. म्हणून विद्यार्थ्यांनी हे बाहेरचे जग अनुभवावे. हे ज्ञान तुमच्या भावी जीवनासाठी उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.'






संपूर्ण प्रदर्शनाच्या मुख्य प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांची वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत फेरफटका मारला. गड्डा यात्रेच्या निमित्ताने आलेल्या धारकांचे मान्यवरांनी कौतुक केले.त्यानंतर उद्घाटन सत्र झाले.उद्घाटन सत्रात प्रारंभी कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण  करून दीप प्रज्वलित करण्यात आले. त्यानंतर वंदना पुरोहित त्यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केलं संस्थेच्यावतीने उपस्थितांचे सत्कार झाले.प्रा. गौरव जुदगार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सत्कारानंतर कुलगुरूंनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी मधील प्राध्यापक ,शिक्षक ,कर्मचारी, मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष पवार यांनी केलं तर आभार प्राध्यापक राजकुमार खिलारे यांनी मानले



**संगमेश्वर कॉलेज वाणिज्य व व्यवस्थापन विभाग उद्योजकता विकास मंडळ यांच्यावतीने आयोजित स्टुडन्ट सिनर्जी एक्सपो 2020 या उद्यमोदय या प्रदर्शनाची क्षणचित्रे**











# पत्रकारिता क्षेत्रात मुबलक संधी : अंकुलकर

## संगमेश्वर महाविद्यालयातील पत्रकारिता विभागाच्या माध्यमविद्या अंकाचे प्रकाशन

सोलापूर : प्रतिनिधी

पत्रकारितेचे क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पत्रकारितेत दर्जात्मक वाढ होऊन मोठी गतिमानता निर्माण झाली आहे. अशा या वेगवान क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना करिअरच्या मुबलक संधी उपल असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार व लेखक अमोल अंकुलकर यांनी केले.

संगमेश्वर महाविद्यालयातील पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे पत्रकार दिन आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त माध्यमविद्या या प्रायोगिक अंकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य धानप्पा मेत्री होते. यावेळी व्यासपीठावर पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे समन्वयक व मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. सुहास पुजारी, प्रा.डॉ. दादासाहेब खांडेकर, प्रा.डॉ. महादेव देशमुख, प्रा.डॉ. सारिपुत्र तुपेरे, प्रा. अनिल कुलकर्णी, प्रा.डॉ. प्रवीण राजगुरु, प्रा.डॉ. बाळासाहेब मागाडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना अंकुलकर म्हणाले की, पत्रकारितेमध्ये आपल्या आवडीनुसार बीट निवडून काम करता येते. भाषा आणि पत्रकारिता यांचा नजीकचा संबंध आहे. भाषेवर प्रभुत्त्व असणारे पत्रकार चांगल्या रितीने विषय मांडू शकतात. भाषेचा अभिमान असावा, मात्र त्याचा अतिरेक नको. आद्य मराठी पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'रूपी लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे.




**फोटो ओळी : माध्यमविद्या प्रायोगिक अंकाचे प्रकाशन करताना अमोल अंकुलकर, उपप्राचार्य धानप्पा मेत्री, प्रा.डॉ. सुहास पुजारी, प्रा.डॉ. दादासाहेब खांडेकर, प्रा.डॉ. महादेव देशमुख, प्रा.डॉ. सारिपुत्र तुपेरे, प्रा. अनिल कुलकर्णी, प्रा.डॉ. प्रवीण राजगुरु, प्रा.डॉ. बाळासाहेब मागाडे आदी.**



यावेळी प्रा.डॉ. सुहास पुजारी म्हणाले की, 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी' अशा शब्दांत सुरेश भटांनी माय मराठी भाषेविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. मराठी भाषा ही विविध बोलीभाषांनी नटलेली असून यातच तिची श्रीमंती आहे. माध्यमविद्या अंकाची सुंदर अशी निर्मिती पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या विद्यार्थ्यांनी केली आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना उपप्राचार्य धानप्पा मेत्री म्हणाले की, भाषा हेच साहित्य आहे. प्रत्येकाला दोनपेक्षा अधिक भाषा यायला हव्यात. भाषाचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा.

यावेळी पत्रकारिता क्षेत्रात विविध संस्थामध्ये कार्यरत असलेल्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत प्रा.डॉ. प्रवीण राजगुरू यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सुहास पुजारी यांनी केले. सूत्रसंचालन पत्रकारितेचे विद्यार्थी राजकुमार शिंदे यांनी, तर आभार मोनिका शिंदे यांनी मानले.



**संगमेश्वर महाविद्यालयातील पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे पत्रकार दिन आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त माध्यमविद्या या प्रायोगिक अंकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमात ते बोलत होते.त्याप्रसंगी पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे विद्यार्थी**

# जेईई परीक्षेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश

सोलापूर (दिनांक १८) राष्ट्रीय परीक्षा परिषद, दिल्ली यांच्या वतीने जानेवारी २०२० मध्ये घेतलेल्या ऑनलाइन जेईई २०२० परीक्षेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.
पर्सेंटाइल पद्धतीने यशस्वी विद्यार्थी- रामक्षा बिराजदार ९८ .५७ ,व्यंकटेश निंबाळे ९८ .२९, विद्यारण्य गवई ९८ .६, ऐश्वर्या गवंडी ९७ .८३, वेदांत माढे ९६.८६, अमेय स्वामी ९४.८६, दिव्या केकडे ९४ .८६, नेहा क्षीरसागर ९२ .३१ ऋतुजा खिल्लारे ९०.६८, रितेश जकापुरे ९०. २३, श्रीनेश कांबळे ९०.२२, हर्षल खांडवे ८३.१८ .भारतातील राष्ट्रीय पातळीवरील आय आय टी अभियांत्रिकी संस्थेत प्रवेशास पात्र होण्यासाठी एनटीए या संस्थेच्या मार्फत जेईई-मेन ही परीक्षा आयोजित केली होती.
या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य ,उपप्राचार्य आनंद हुली, लॉजिक इन्स्टिट्यूटचे प्रा. सुशांत माळगे, प्रा. शिवराज बगले प्रा.अविनाश घोडके, पर्यवेक्षक प्रसाद कुंटे,प्रा. प्रमोद उडगीकर,प्रा. सिद्धाराम विजापुरे, प्रा. राजकुमार खिलारे, समन्वय डॉ. गणेश मुडेगावकर, यांनी अभिनंदन केले.





# विधी क्षेत्रात येताना प्रामाणिक अभ्यास महत्त्वाचा आयेशा पिरजादे

## संगमेश्वर ज्युनियर कॉलेजमध्ये सामान्यज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण

सोलापूर ( दिनांक 21)
विधी क्षेत्रात येणार असाल तर प्रामाणिक अभ्यास महत्त्वाचा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना बारावीनंतर कोणत्याही क्षेत्रात स्पर्धा परीक्षेतून यशस्वी व्हायचे असेल तर ज्या त्या क्षेत्रातील आवड निर्माण करणे गरजेचे आहे तर आणि तरच आपण या तीव्र स्पर्धेत यशस्वी होऊ शकतो असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व प्रथम न्यायदंडाधिकारी या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तोळणुरच्या आयेशा अजीजपाशा पिरजादे यांनी केलं. त्या संगमेश्वर कॉलेजच्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेच्या बक्षीस वितरण प्रसंगी बोलत होत्या. त्याप्रसंगी उपप्राचार्य आनंद हुली, कला शाखेचे समन्वयक प्रा. शिवशरण दुलंगे आदी मान्यवर उपस्थित होते.










प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रा. कोमल कोंडा यांनी कला शाखेच्या उपक्रमाविषयी चित्रफितीच्या माध्यमातून सांगितले. कॉलेजच्या वतीने दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व प्रथम न्यायदंडाधिकारी या परीक्षेत यशस्वी झाल्याबद्दल आयेशा यांचा मातोश्री सह सत्कार करण्यात आला. त्यानंतर प्रा.रश्मी कन्नूरकर यांनी त्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्या म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी आपली अक्कलकोट तालुक्यातील तोळणूर पासूनची यशोगाथा सांगितली. त्यानंतर सामान्य ज्ञान स्पर्धेतील यशस्वीतांचा सत्कार करण्यात आला.
सामान्य ज्ञान स्पर्धेचा निकाल- चन्नाप्पा येडगे, राजश्री हिप्परकर, द्वितीय - सुचिता सरवदे ,स्वामिनी रुपनर, तृतीय - अर्चना जवळकोटे, युनूस बरुर , उत्तेजनार्थ - भगवान देशमुख,मानसी जोशी, आरती बुधाराम,स्वाती धोत्रे (नेताजी जुनियर कॉलेज सोलापूर) प्रा.विश्वनाथ कक्कळमेली यांनी यादी वाचन केले.
याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. शिवराज पाटील ,प्रा. शहाजी माने, प्रा. बसय्या हणमगाव, प्रा. सायबण्णा निंबर्गी,प्रा. रंगसिद्ध पाटील,प्रा. प्रकाश कतनाळे, प्रा. संतोष पवार ,प्रा. हर्षवर्धन पाटील, प्रा. वामन वेताळ,प्रा. विठ्ठल आरबाळे,प्रा. शिवराज देसाई आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. दत्तात्रय गुड्डेवाडी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. शंकर कोमुलवार यांनी सर्वांचे आभार मानले.



# जाहिरात क्षेत्रात विविधांगी संधी आहेत - नौशाद शेख

## संगमेश्वरमध्ये शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेचे बक्षीस वितरण व भाषा संकुलाच्या 'युवाचेतना' भित्तीपत्रकाचे उद्घाटन




सोलापूर ( दिनांक २२)
'' बदलत्या संगणकीय आणि इंटरनेट क्षेत्रात जाहिरात क्षेत्रात विविधांगी संधी आहेत. त्या शोधून आपले आवड कशात आहे ते ओळखून काही तांत्रिक गोष्टी शिकल्या की आपण आपले उत्तम करिअर घडवू शकतो. महाविद्यालयीन स्तरावरील भाषिक कौशल्य कोणती आहेत ती आपण ओळखली पाहिजे '' असे प्रतिपादन दैनिक दिव्य मराठीचे युनिटेड हेड नौशाद शेख यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेजच्या जाहिरात आणि शब्दकोडे स्पर्धेच्या बक्षीस आदी मान्यवर उपस्थित होते. वितरण प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.याप्रसंगी उपप्राचार्य आनंद हुली, भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ सुहास पुजारी
प्रारंभी भाषा संकुलाच्या वतीने पाच भाषा मधून तयार करण्यात आलेल्या 'युवाचेतना' भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत झालं. डॉ. गणेश मुडेगावकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिला. कॉलेजच्या वतीने त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला .प्रा. संतोष पवार यांनी भाषा व संस्कृती मंडळाचा इतिवृत्तांत चित्रफितीतुन सांगितला. त्यानंतर या विद्यार्थ्यांची मनोगत झाली . मनोगत त्यानंतर प्रमुख पाहुण्यांना आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेतील विजेत्यांना ग्रंथ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

YouTube

**संगमेश्वर कॉलेजच्या https://www.sangameshwarcollege.ac.in/ ( सिनिअर कॉलेज)**
**आणि http://www.sangameshwarcollege.in/ ( ज्युनिअर कॉलेज )**
**या वेबसाईटला अवश्य भेट द्या.**
**श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेच्या**
**https://www.youtube.com/c/SESSangameshwarCollege यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या.**

# शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेचा निकाल

## शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेचा निकाल

**हिंदी शब्दकोडे** –, वैष्णवी पाटील (प्रथम),दिव्या मुगळीमठ ( द्वितीय), आध्या जयदीप ( तृतीय ), सुफिया पठाण, वर्षाराणी बावकर (उत्तेजनार्थ)

**अन्य महाविद्यालय गट** – वैष्णवी पाटील(प्रथम), वर्षा सुरवसे ( द्वितीय), रेणुका मेहत्रे ( तृतीय ),पुनम माळी, पवन कारमपुरी, प्रथमेश मंगोडेकर, अबोली कुमार, अंबादास अदालोळू , विवेक असादे( उत्तेजनार्थ).जाहिरात – सुमन पंगुडवाले (प्रथम) पौर्णिमा साळुंखे (द्वितीय) श्वेता पंगुडवाले (तृतीय) सिमरन शेख (तृतीय) वैष्णवी काळे, सिमरन माळवदकर (उत्तेजनार्थ) **अन्य महाविद्यालय गट–** वैष्णवी कामूर्ती (प्रथम) नेहा राऊत ( द्वितीय) शौकत बागवान (तृतीय) महेश्वरी म्हंता, आसावरी वाघमारे, लक्ष्मी येरगुंटला (उत्तेजनार्थ)

**संस्कृत –** ऋषिकेश कुलकर्णी,मानसी जोशी (प्रथम) अरुंधती कुलकर्णी, वैष्णवी शेटे (द्वितीय) प्रेरणा देशपांडे, समर्थ स्वामी( तृतीय), **जाहिरात –** शिवराज स्वामी (प्रथम) ऋषिकेश कुलकर्णी (द्वितीय) सिद्धी नेने (तृतीय)

**इंग्रजी –शब्दकोडे** – संकेत जाधव, भूमिका गायकवाड (प्रथम) लक्ष्मण मदगोंडे,उमर शेख, विनायक कोनाडे,संदीप माडकर, विद्यालक्ष्मी गुरुशेट्टी, श्रुती डोंगरे, निशांत काझी, स्नेहलता होटकर( द्वितीय) **जाहिरात** – आर्या शिवशरण(प्रथम ) प्रज्ञा वाघमोडे, भूमिका गायकवाड (द्वितीय) प्रियांका कोरी, प्रथमेश चौगुले (तृतीय) सौंदर्या पटाले, आझम इनामदार, मिताली चौबे (उत्तेजनार्थ)

**मराठी –शब्दकोडे** – प्राजक्ता ओलेकर, सानिकाधमगुंडे, समर्थ स्वामी, विनायक कोणदे, वैष्णवी शिंदे, भाग्यश्री कोळी, ऋतुजा अगरखेड, सानिका सोनार , समृद्धी गुंड, पूनम कोळी, साक्षी केळकर, निमिषा कामाटी, पूजा कोळी, द्वितीय क्रमांक – सागर जमादार, विकास जाधव, हर्षा शिरगण, स्नेहलता होटकर, निकिता पाटील, संध्याराणी कापसे, ऐश्वर्या कोळी, श्रावणी नवगिरे, वैष्णवी सुमंत. तृतीय क्रमांक – विशाल बोराडे.

**मराठी जाहिरात स्पर्धा** – प्रथम – अंकित कदम, द्वितीय – साक्षी वाले, धानेश्वरी उमराणी. तृतीय – लक्ष्मी हुळळे, उत्तेजनार्थ – सौंदर्या पाताळे, सोनी राठोड.

**कन्नड –शब्दकोडे** – प्रथम– भाग्यश्री गायकवाड ,द्वितीय – भौरम्मा स्वामी, तृतीय– किर्ती बळुरगी उत्तेजनार्थ – वैष्णवी बिज्जूणगी, अंजुम डांगे . **कन्नड जाहिरात स्पर्धा** – प्रथम – भौरम्मा स्वामी , द्वितीय – भाग्यश्री गायकवाड, तृतीय – वैशाली हाऊशेट्टी, उत्तेजनार्थ– वैष्णवी बिज्जूणगी, किर्ती बळुरगी.

याप्रसंगी प्रा.चंद्रकांत जाधव, प्रा.विद्या अजनसोंडकर, नाट्यलेखक मुकुंद हिंगणे,प्रा. बसय्या हणमगाव, प्रा.तानाजी घाडगे, प्रा.अनिता अलकुंटे, प्रा.मंजुळा बीड, प्रा.शिवराज देसाई, प्रा.कोमल कोंडा, प्रा.राजश्री पाटील, प्रा.रश्मी कन्नूरकर, प्रा.विठ्ठल आरबाळे, प्रा.शिवशरण दुलंगे, प्रा. दत्तात्रय गुड्डेवाडी, प्रा.विश्वनाथ कक्कळमेली, प्रा.हर्षवर्धन पाटील यांच्यासह स्पर्धेतील विद्यार्थी पालक बहुसंख्येने उपस्थित होते.प्रियांका कोरी हिने सूत्रसंचालन केले तर सुफियान पठाण याने आभार मानले.

**श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेच्या**
https://www.youtube.com/c/SESSangameshwarCollege
**यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या.**

## संगमेश्वरमध्ये शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेचे बक्षीस वितरण व भाषा संकुलाच्या 'युवाचेतना' भित्तीपत्रकाचे उद्‌घाटन झाले त्याची काही क्षणचित्रे





## संगमेश्वरमध्ये शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेचे बक्षीस वितरण व भाषा संकुलाच्या 'युवाचेतना' भित्तीपत्रकाचे उद्घाटन झाले त्याची काही क्षणचित्रे











## संगमेश्वरमध्ये शब्दकोडे आणि जाहिरात स्पर्धेचे बक्षीस वितरण व भाषा संकुलाच्या 'युवाचेतना' भित्तीपत्रकाचे उद्घाटन झाले त्याची काही क्षणचित्रे











# दानातून मुलांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते
## - दत्ता गायकवाड

## संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या चिमुकल्याकडून 'आपलं घर' ला सात क्विंटलचे धान्य

सोलापूर (दिनांक २३)
''धान्याच्या दानातून मुलांमध्ये त्यांच्या संस्कारक्षम वयात सामाजिक जाणीव निर्माण होते. ही कौतुकाची बाब आहे. असे समाजोपयोगी उपक्रम या शाळेमध्ये घेतले जातात. हे अभिनंदनीय यातून सामाजिक मूल्ये मुलामध्ये रुजतात .'' असे प्रतिपादन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते दत्ता गायकवाड यांनी केलं. ते संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये 'अन्नपूर्णा चळवळी'च्या माध्यमातून घेतलेल्या कार्यक्रमात बोलत होते. त्यांच्या उपस्थितीत शाळेतील चिमुकल्यांनी जमवलेले सात क्विंटल धान्य 'आपल घर' नळदुर्ग या संस्थेस सुपूर्त करण्यात आले. याप्रसंगी मंचावर ज्येष्ठ विधीज्ञ वि. गो. म्हेत्रस, अध्यक्ष धर्मराज काडादी, मोहन भूमकर, बाबुराव मैंदर्गिकर, नरेश ठाकूर, त्रिवेणी मुरलीधर, प्राचार्या गायत्री कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते




**'आपल घर' नळदुर्ग या संस्थेस धान्य वितरित करताना ज्येष्ठ विधीज्ञ वि. गो. म्हेत्रस, अध्यक्ष धर्मराज काडादी, मोहन भूमकर, बाबुराव मैंदर्गिकर, नरेश ठाकूर, त्रिवेणी मुरलीधर, प्राचार्या गायत्री कुलकर्णी आणि विद्यार्थी .**



प्रारंभी दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर प्राचार्य गायत्री कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केलं. त्यानंतर शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार झाला. सत्कारानंतर प्रातिनिधिक स्वरूपात आपलं घर नळदुर्ग ते प्रतिनिधी नरेश ठाकूर यांच्याकडे संपूर्ण धान्य सुपूर्त करण्यात आले. शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत आपली कृतज्ञता ठाकूर यांनी व्यक्त केली. '' शाळेच्या वतीने अशा उपक्रमातून सामाजिक भान जपले जाते. मुलांमध्ये सामाजिक जाणीव जागृती निर्माण करता येते.'' असे धर्मराज काडादी यांनी आपल्या मनोगतात सांगितले. तत्पूर्वी कियान कुलकर्णी या विद्यार्थ्याने आपले मनोगत व्यक्त केले.

यापसंगी पब्लिक स्कूल मधील संगमेश्वर पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य वादीराज कुलकर्णी, शोभा गोटे, प्री स्कुलच्या स्नेहल मडकी, सुनिशा किनगी,अश्विनी पवार, भाग्यश्री राठोड, ज्योती माने यांच्यासह विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. आरशी मणियार यांनी सूत्रसंचालन केले तर वैष्णवी देशपांडे यांनी सर्वांचे आभार मानले.



**दान दिल्याने ज्ञान वाढते,**
**त्या ज्ञानाचे मंदिर हे**
**सत्य शिवाहुन सुंदर हे...**

# ध्येय ठरवून, रणनीती आखून त्वेषाने लढा : डॉ. रोंगे

## संगमेश्वर कॉलेजचा 67 वा वार्षिक पारितोषिक वितरण उत्साहात

सोलापूर,दि.28- शिक्षणक्षेत्रात संगमेश्वर कॉलेजचा दबदबा कायम असून या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सातत्याने ही परंपरा राखली आहे. शैक्षणिक गुणवत्ता व क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल असे यश विद्यार्थ्यांनी संपादन केले आहे. आता आयुष्याची स्पर्धा स्वतःशी करत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवून, रणनीती आखून त्वेषाने लढायला शिकावे, असे आवाहन पंढरपूरच्या स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य तथा श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च संस्थेचे सचिव डॉ. बी. पी. रोंगे यांनी केले.

श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित संगमेश्वर कॉलेजच्या 67 व्या वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रोंगे हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. इरेश स्वामी, संस्थेचे सचिव धर्मराज काडादी, व्यवस्थापन समितीचे सदस्य पुष्पराज काडादी, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सी. बी. नाडगौडा, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. आवटे, कर्मयोगी कै अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दीपक पाटील, उपप्राचार्य ए. के. हुली, विद्यार्थी प्रतिनिधी तृप्ती अवताडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी संगमेश्वर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. शोभा राजमान्य यांनी स्वागत व प्रास्ताविक करत कॉलेजच्या प्रगतीच्या अहवालाचे वाचन केले.




**संगमेश्वर कॉलेजच्या 67 व्या वार्षिक शैक्षणिक पारितोषिक वितरण समारंभात डॉ. बी. पी. रोंगे यांनी मार्गदर्शन केले.**

डॉ. रोंगे म्हणाले की, बक्षिसे प्राप्त केलेल्या व बक्षिसे न मिळालेल्या विद्यार्थ्यांनीआयुष्याच्या स्पर्धेत खिलाडूवृत्ती ठेवावी. यशाने हुरळून न जाता व उन्मादित न होता जिद्दीने प्रवास करावा. आयुष्य हा खडतर प्रवास आहे. जिंकणे अथवा हरणे हा या स्पर्धेच्या प्रक्रियेचा एक भाग आहे. खरी स्पर्धा ही आपल्या आयुष्याशी असते. स्वतःला स्पर्धक बनवून लढत रहा. कोणतीही स्पर्धा जिंकण्यासाठी ध्येय ठरवणे गरजेचे असते, कारण यातून त्याची दिशा सापडत असते. ध्येय साध्य करण्यासाठी ध्येयवेडे होणे आवश्यक असते. रडत न बसता लढत राहणे, हे प्रत्येक विद्यार्थ्यांनी ठरवायला हवे. आपण निश्चित केलेल्या ध्येयासाठी आतून पेटून उठणे, प्रबळ इच्छाशक्ती निर्माण करणे आणि चिकाटीने प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे मत यावेळी डॉ. रोंगे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाची सुरुवात रसिका कुलकर्णी हिच्या ईशस्तवनाने झाली. मान्यवरांचा परिचय प्रा लीना खमीतकर यांनी करून दिला. पर्यवेक्षक प्रसाद कुंठे यांनी कनिष्ठ महाविद्यालय, डॉ. आरती दिवटे यांनी वरिष्ठ महाविद्यालय तर सांस्कृतिक पारितोषिक यादीचे वाचन प्रा. शिवराज पाटील यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, संगमेश्वर वरिष्ठ महाविद्यालय, संगमेश्वर रात्र महाविद्यालय आणि कर्मयोगी अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले..






# पालकांनी मुलांशी संवादी व्हावे -- कमल शहा

## संगमेश्वर पब्लिक स्कूल प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन उत्साहात




सोलापूर (दिनांक २९) '' शाळा, घर, व्यवसाय, नोकरी सांभाळताना पालकांनी मुलांसाठी वेळ काढून संवादी झालं पाहिजे. मुलांच्या सर्वांगीण विकासात पालकनीती महत्त्वाची आहे. ती जबाबदारी निभावली तरच विद्यार्थी परिपूर्ण घडतील.'' असे विचार ज्येष्ठ समुपदेशक कमल शहा यांनी मांडले. त्या संगमेश्वर पब्लिक स्कूल प्राथमिक विभागाच्या स्नेहसंमेलनात पारितोषिक वितरण प्रसंगी बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर अध्यक्ष धर्मराज काडादी, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य,एस. जे.आवटे , व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, शीतल काडादी, प्राचार्य गायत्री कुलकर्णी, पर्यवेक्षिका कीर्ती शंकू आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी प्रतिमा पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंजली राठोड यांनी केले. तृप्ती पसनूर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली . शाळेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. किर्ती शंकू यांनी अहवालाचे वाचन केले. त्यानंतर कमल शहा यांनी पालकांना मार्गदर्शन केलं. त्या पुढे म्हणाल्या, '' यंत्र युगातील तंत्राचा प्रसार आणि प्रचार मोठा होतोय. त्यात मोबाईल संस्कृतीने मुलांवर प्रचंड गारुड घातले आहे. यातून बाहेर येण्यासाठी स्वतः पालकांनी वेगवेगळे छंद आवडीने जोपासून मुलांनाही त्यासाठी प्रोत्साहित करावे. घर आणि शाळा यात आनंदी वातावरण ठेवण्यासाठी पालकांनीच प्रयत्न करावेत.'

अध्यक्षीय समारोपात धर्मराज काडादी म्हणाले की, '' गुणवत्तापुर्ण शिक्षण प्रणालीमध्ये सीबीएससी चे शिक्षण सोलापुरातल्या मुलांना मिळावे यासाठी संस्था प्रयत्नशील होती. त्याप्रमाणे ही शाळा आज आपणा सर्वांच्या सहकार्याने उभी आहे. लवकरच स्वतंत्र क्रीडांगण विभागासह वैविध्यपूर्ण मैदानी खेळासाठी शाळा नावारूपास येईल. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.'' '




याप्रसंगी सिद्धेश्वर देवस्थान समितीचे सदस्य आर. एस. पाटील, सिद्धेश्वर प्रशालेचे प्राचार्य संतोष पाटील, डॉक्टर दिपाली करजगीकर, उपप्राचार्य वादिराज कुलकर्णी, प्रशांत बिराजदार, शोभा गोटे यांच्यासह संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.सूत्रचालन मधू कुकरेजा यांनी केले तर नेहा अगरवाल यांनी आभार मानले.




**संगमेश्वर पब्लिक स्कूल प्राथमिक विभागाच्या स्नेहसंमेलनात पारितोषिक वितरण प्रसंगी समुपदेशक कमल शहा,अध्यक्ष धर्मराज काडादी, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य,एस. जे.आवटे , व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी, शीतल काडादी, प्राचार्य गायत्री कुलकर्णी, पर्यवेक्षिका कीर्ती शंकू आदी मान्यवर**

# संगमेश्वर पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

## शालेय उपक्रमातून विद्यार्थी संस्कृती शकतो - डॉ. उमा प्रधान

सोलापूर - ( दिनांक ३१ )

'' मुलांच्या जडणघडणीच्या वयात अनेक शालेय उपक्रमातून विद्यार्थी आपली भारतीय संस्कृती शिकतो. संस्कृतीतील परंपरा,गीत - संगीत, नाटक यांच्या बारकव्यातून सण उत्सव परंपरा याची जाणीव मुलांना होते. सांस्कृतिक कार्यक्रमातून मुलांना व्यक्त व्हायला संधी असते. त्याचा लाभ घेताना पालकांनी मुलांना प्रोत्साहित केले पाहिजे.'' असे प्रतिपादन डॉ. उमा प्रधान यांनी केले. त्या संगमेश्वर पब्लिक स्कूलच्या स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.याप्रसंगी मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य,एस. जे.आवटे, पालक प्रतिनिधी पूजा शिंदे, महेश गौडनवरू, शीतल काडादी, प्राचार्य गायत्री कुलकर्णी, पर्यवेक्षिका कीर्ती शंकू आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी गणेश वंदनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. दीपप्रज्वलनानंतर उपप्राचार्य वादिराज कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. त्यानंतर प्राचार्य गायत्री कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केलं. प्रमुख पाहुण्यांचा शाळेच्या वतीने सत्कार झाला. याच कार्यक्रमात आदर्श विद्यार्थी आणि आदर्श शिक्षिका पुरस्कार देण्यात आले. यामध्ये वैष्णवी देशपांडे, वीणा अन्नलदास , वैष्णवी देशपांडे यांचा पुरस्कार देऊन गौरव झाला.



**पालकांना मार्गदर्शन करताना डॉ. उमा प्रधान , संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. इरेश स्वामी, धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य,एस. जे.आवटे, शीतल काडादी, प्राचार्य गायत्री कुलकर्णी, पर्यवेक्षिका कीर्ती शंकू,पालक प्रतिनिधी पूजा शिंदे, महेश गौडनवरू, आदी मान्यवर.**

अहवाल वाचन हीना पटेल आणि जान्हवी कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी केलं. त्यानंतर शाळेतल्या विद्यार्थ्यांनी भूपाळी पासून ते देशभक्तीपर गीतापर्यंत वेगवेगळ्या गाण्यांवर सदाबहार सादरीकरण केले. डॉ. प्रधान पुढे म्हणाल्या की, '' पुलंनी सांगितल्याप्रमाणे आपल्या उपजीविकेचे साधन कोणतेही असो मात्र जीवन जगण्यासाठी मुलांना एखादी तरी कला शिकवा. त्यातून त्याचा सर्वांगीण विकास होईल खऱ्या अर्थाने तो माणूस म्हणून जगेल.''

याप्रसंगी सिद्धेश्वर देवस्थान समितीचे सदस्य आर. एस. पाटील, सिद्धेश्वर प्रशालेचे प्राचार्य संतोष पाटील, डॉक्टर दिपाली करजगीकर, उपप्राचार्य वादिराज कुलकर्णी, राजशेखर पाटील,प्रशांत बिराजदार,मीनाक्षी कत्ते, शोभा गोटे, प्रीती दुलंगे,सुनीशा कणगी,मनोज चव्हाण यांच्यासह संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. हैदर बागवान आणि रमशा मिनियार यांनी सूत्रसंचालन केले.





# संगमेश्वर पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणानेउत्साहात झाले.त्याची काही क्षणचित्रे











# संगमेश्वरच्या सॅन उत्सवात तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग

## तरुणांनो विविधांगी कलाप्रकारातून व्यक्त व्हा -डॉ. सी. बी. नाडगौडा

सोलापूर ( दिनांक २ )
''सॅन उत्सवा सारख्या उपक्रमातून कॉलेजच्या जीवनात आपल्यातल्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो. म्हणून ही संधी न दवडता तरुणांनो विविधांगी कलाप्रकारातून व्यक्त व्हा.'' असे विचार श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सी. बी. नाडगौडा यांनी मांडले. ते संगमेश्वर कॉलेज व्यवस्थापन व संगणक शास्त्र विभाग आयोजित सॅन उत्सव या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, व्यवस्थापन समिती सदस्य तथा विभाग प्रमुख प्राध्यापिका ज्योती काडादी, प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, उपप्राचार्य आनंद हुली आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्यानंतर प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य यांनी या राज्यस्तरीय सॅन उत्सवाची पार्श्वभूमी सविस्तर सांगून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करत हेतू सांगितला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार कॉलेजच्या वतीने करण्यात आला.




डॉ. नाडगौडा पुढे म्हणाले, '' की समाजात विविध विषयावर भाष्य करणारी अनेक मंडळी निर्माण होत आहेत. आपण जे बोलतो ते त्यांनाच माहीत नसलेली माणसापासून ते अनेक प्रकारचे भाष्यकार आपल्या आजूबाजूला अभिव्यक्त होत असतात. त्यांचे सूक्ष्म निरीक्षण करून तरुणांनी आपल्या हिताचे काय आहे हे पाहिले पाहिजे. त्यातून आपली दृष्टी निर्माण होऊन आपले स्वतंत्र विचार तयार होतात. कॉलेज जीवनातील व्यक्तिमत्त्वाला आकार देणाऱ्या अशा उत्सवात तरुणांनी उत्साहाने सहभागी झाले पाहिजे.''

याप्रसंगी संगमेश्वर कॉलेज वरिष्ठ, कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक मंडळी, व्यवस्थापन व संगणक शास्त्र विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक मंडळी, वेगवेगळ्या महाविद्यालयाचे स्पर्धक बहुसंख्येने उपस्थित होते . जान्हवी पिल्लई या विद्यार्थीनीने सूत्रसंचालन केले तर प्रा. गौरव जुदगार यांनी सर्वांचे आभार मानले.










# संगमेश्वरच्या सॅन उत्सवात तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग... त्याची काही क्षणचित्रे





# राज्यस्तरीय सतरावे विद्यार्थी इतिहास परिषद अधिवेशन संगमेश्वर मध्ये संपन्न

## प्राचार्य आर. डी. गायकवाड यांना जीवनगौरव प्रदान

# इतिहास अनुभवताना तो जगता आला पाहिजे - डॉ. शिवरत्न शेटे



**सोलापूर (दिनांक ३)** " इतिहासाच्या विद्यार्थ्यांनो कॉलेज जीवनामध्ये इतिहास अनुभवताना तो जगता आला पाहिजे तरच तुम्ही संशोधनात खऱ्या अर्थाने काम करू शकाल'' असे प्रतिपादन शिवव्याख्याते डॉक्टर शिवरत्न शेटे यांनी केलं. ते संगमेश्वर महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय सतरावे विद्यार्थी इतिहास परिषद अधिवेशनात उद्घाटन सत्रातील कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी मंचावर प्राचार्य आर. डी. गायकवाड, डॉ. हेमलता गायकवाड, प्राचार्य शोभा राजमान्य, प्राचार्य संजय आवटे, प्रा. रामचंद्र संगशेट्टी, विद्यार्थी प्रतिनिधी ऋतिक कुरले, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.




प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्राध्यापक रामचंद्र संगशेट्टी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. नभा काकडे यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देत मानपत्राचे वाचन केले . त्यानंतर कॉलेजच्या वतीने मान्यवरांचा सत्कार झाला. यामध्ये प्राचार्य आर. डी. गायकवाड यांना सपत्निक जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात डॉ.शिवरत्न शेटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं ते पुढे म्हणाले की, '' भारत वर्षाला जाज्वल्य इतिहासाची परंपरा आहे. ती सर्वसामान्यांपर्यंत नेताना महाराष्ट्राचा मुलुख देखील कळला पाहिजे. याकरता आपण अखंडपणे संशोधक वृत्तीने काम केले पाहिजे. शिवचरित्राचा अभ्यास जेवढ्या तन्मयतेने आपण करू तेवढी ऊर्जा आपल्यात निर्माण होते. खरा इतिहास आपल्याला जगता येतो." या उद्घाटन सत्रानंतर दोनशे वीस विद्यार्थ्यांनी पेपर वाचन केलं. यामध्ये मध्ययुगीन, आधुनिक इथपासून ते मराठ्यांच्या इतिहासापर्यंच्या वेगवेगळ्या विषयावरील पेपर प्रेझेंटेशन झाले.

याप्रसंगी जीवनगौरव पुरस्कार प्राप्त प्राचार्य डॉक्टर आर.डी. गायकवाड यांनी सत्काराला उत्तर देताना आपलं मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, '' रयतच्या कर्मवीरांच्या सानिध्यात मी घडलो. त्यामुळे जीवनाचा खरा मार्ग दिसला. त्यातून इतिहास ग्रंथलेखन करून विद्यार्थ्यांना ज्ञानामृत देऊ शकलो. हीच खरी मला मिळालेल्या जीवन गौरवाची पोहोच पावती आहे .असे मी मानतो. इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी विद्या अभ्यास करून अथक परिश्रमाने इतिहासाचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे. त्यातूनच वस्तुनिष्ठ इतिहासाचे संशोधन करण्याचीची वृत्ती निर्माण होते.परिस्थिती प्रतिकूल असली तरी त्यातून मार्ग निघत असतो. त्याचे भांडवल न करता जिद्दीने वाटचाल करत आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर संशोधन करून समाजापुढे स्वतःची ओळख निर्माण केली पाहिजे.'' असेही ते म्हणाले.




**संगमेश्वर महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय सतरावे विद्यार्थी इतिहास परिषद अधिवेशनात उद्घाटन सत्रातील कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. शिवरत्न शेटे . याप्रसंगी मंचावर प्राचार्य आर. डी. गायकवाड, डॉ. हेमलता गायकवाड, प्राचार्य शोभा राजमान्य, प्राचार्य संजय आवटे, प्रा. रामचंद्र संगशेट्टी, विद्यार्थी प्रतिनिधी ऋतिक कुरले, आदी**

यावेळी डॉक्टर श्रीकांत येळेगावकर, प्राचार्य के. एम. जमादार, प्राचार्य डॉक्टर वसंतराव बनसुडे, प्रा. एम. एस. शेख,उपप्राचार्य डी. एम. मैत्री, प्रा.एम ए म्हस्के, अमोल मोहिते, प्रा. डॉक्टर राजेंद्रसिंह लोखंडे, प्राध्यापिका सोनाली गिरी, प्रा. लक्ष्मी रेड्डी, डॉक्टर शीला स्वामी, प्रा. विष्णू विटेकर, प्रा. संतोष पवार, प्रा. मनोज कसबे ,प्रा. युवराज सुरवसे, सचिव कुमारी साबा शेख यांच्यासह विद्यार्थी इतिहास परिषदेचे बहुसंख्य पदाधिकारी,शहर आणि जिल्ह्यातील महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. सोनाली गिरी यांनी सूत्रसंचालन केले तर विद्यार्थी प्रतिनिधी ऋतिक कुर्ले यांनी सर्वांचे आभार मानले.






**संगमेश्वर महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय सतरावे विद्यार्थी इतिहास परिषद अधिवेशनात उपस्थित इतिहासप्रेमी ...**

# ज्ञानाचे उपयोजनात रुपांतर करणे हेच परिणती आधारित शिक्षणाचे कार्य होय - प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड

## संगमेश्वर कॉलेज आईक्यूएसी विभागातर्फे एक दिवसीय कार्यशाळा

सोलापूर दिनांक 12
'' आजच्या प्रगत आणि गतिमान युगात रोजगाराभिमुख, गरजाभिमुख व बाजाराभिमुख शिक्षणाची गरज निर्माण झाली असून आजचे शिक्षण विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील जीवनात कसे उपयुक्त ठरेल हे पाहणे आवश्यक बनले आहे. बाहेरच्या जगात कशाची गरज आहे ते समजून अभ्यासक्रम आखले गेले, तसे शिक्षण दिले गेले,तर त्या शिक्षणाची परिणती विद्यार्थ्यांच्या जीवनात दिसू लागेल. म्हणूनच ज्ञानाचे उपयोजनात रुपांतर करणे हेच परिणती आधारित शिक्षणाचे कार्य आहे.'' असे विचार बॅरिस्टर धनंजयराव गाडगीळ कॉमर्स कॉलेज सातारच्या प्राचार्य डॉक्टर प्रतिभा गायकवाड यांनी मानले. त्या संगमेश्वर कॉलेज विभागातर्फे आयोजित 'आउट कम बेस्ड एज्युकेशन' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटक म्हणून बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, आईक्यूएसी विभाग प्रमुख डॉ. आर. व्ही. देसाई,उपप्राचार्य धानप्पा मैत्री, डॉ.श्रीनिवास गोठे, डॉ.वंदना पुरोहीत उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. डॉ. आर. व्ही. देसाई यांनी आपल्या प्रास्ताविकातून या एकदिवसीय कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर डॉ. दत्तकुमार म्हमाणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार कॉलेजच्या वतीने करण्यात आला. सत्कारानंतर प्रमुख पाहुण्यांनी उपस्थित प्राध्यापकांशी संवाद साधला.






प्राचार्य डॉ. प्रतिभा गायकवाड पुढे म्हणाल्या की, '' रोजगार निर्मितीक्षम अभ्यासक्रमाचे महत्त्व आता विद्यार्थ्यांना पटले आहे. त्याकडे त्यांचे लक्ष वाढलेआहे. त्यात त्यांची आवड निर्माण करून तसे कोर्सेस स्वायत्त महाविद्यालयांमधून उपल झाले तर त्यांचे शिक्षण हे जीवनाभिमुख बनेल. व्यापार, उद्योगात संधी प्रचंड आहेत. त्यासाठी लागणारी मनुष्यबळाची संख्याही ही वाढते आहे.

त्या उद्योगांना लागणारे कौशल्यपूर्ण मनुष्यबळ बनवणे हे आपले काम आहे.बाहेरच्या या स्पर्धात्मक जगाची ओळख विद्यार्थ्यांना झाली पाहिजे. गरजा ओळखून अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला गेला तर विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती होईल. यात पालकांची भूमिका महत्त्वाची आहे.''

या भाषणानंतर प्रतिभा गायकवाड यांनी प्रश्नोत्तराच्या सत्रात विचारलेल्या प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली. याप्रसंगी संगमेश्वर कॉलेज आणि शहर परिसरातील प्राध्यापक मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. प्रा.डॉ.आरती दिवटे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. श्रीनिवास गोठे यांनी सर्वांचे आभार मानले



**संगमेश्वर कॉलेजच्या**
**https://www.sangameshwarcollege.ac.in/ (सिनिअर कॉलेज)**
**आणि http://www.sangameshwarcollege.in/ ( ज्युनिअर कॉलेज )**
**या वेबसाईटला अवश्य भेट द्या.**

**श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर या संस्थेच्या**
**https://www.youtube.com/c/SESSangameshwarCollege**
**यूट्यूब चॅनलला अवश्य भेट द्या.**

# कै. मेघराज काडादी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

## काकांनी संस्थात्मक काम करताना सहकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला - बाळासाहेब भोगडे

सोलापूर ( दिनांक १३ ) ''आदरणीय कै. मेघराज काकांनी सिद्धेश्वर देवस्थान पासून ते कॉलेज पर्यंत वेगवेगळ्या संस्थांवर काम करत असताना वयाचे कसलेही बंधन न ठेवता सहकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.'' असे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे सदस्य बाळासाहेब भोगडे यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेजमध्ये कै. मेघराज काडादी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर शोभा राजमान्य, देवस्थान समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर, प्राचार्य एस. जे.आवटे, कला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील, उपप्राचार्य आनंद हुली, श्रीनिवास गोठे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी कै. मेघराज काडादी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिवराज पाटील यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कॉलेजच्या वतीने बाळासाहेब भोगडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर भोगडे यांनी मेघराज काकांच्या आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य शोभा राजमान्य यांनी केला. डॉ. राजकुमार मोहोरकर यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी संगमेश्वर कॉलेज शिक्षण संकुलातील ,चित्रकला महाविद्यालय , पब्लिक स्कूल येथील प्राध्यापक , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होता.








# कविश्रेष्ठ कुसुमाग्रज व कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांना संगमेश्वरमध्ये अभिवादन

**सोलापूर (दिनांक २७)** कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त व संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक आदरणीय कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांच्या स्मृतिदिनानिमित्त संयुक्त अभिवादनाचा कार्यक्रम कॉलेजच्या प्रांगणात संपन्न झाला. याप्रसंगी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज आणि कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जीवन कार्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली . पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सुविद्या प्रकाशनचे बाबुराव मैंदर्गिकर यांची प्रमुख उपस्थिती होती.मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुहास पुजारी , प्राचार्य एस. जे. आवटे डॉ. संघप्रकाश दुड्डे, डॉ.महादेव देशमुख आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. अभिवादनानंतर प्रा.डॉ. सुहास पुजारी यांनी मराठी विभागामार्फत आयोजित या कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट करताना कर्मयोगी आप्पासाहेब यांच्या कार्याचा परिचय देत कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या काव्यपंक्ती द्वारे विद्यार्थ्यांसमोर पुस्तकांचे भावविश्व उलगडले. कॉलेजच्या वतीने बाबूराव मैंदर्गीकर यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मैंदर्गीकर यांनी आपल्या मनोगतातून पुस्तकांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. अमोल कोटगोंडे,सुयश कविटकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संतोष पवार यांनी सूत्रसंचालन केले तर ऋतिक कुर्ले यांनी आभार मानले.

याप्रसंगी उपप्राचार्य डी. एम. मेत्री डॉ. राजकुमार मोहरकर. प्रा.श्रीनिवास भंडारी, प्रा.रेवणसिद्ध हालोळी , प्रा. मुस्तफा मकानदार, प्रा. शिवाजी मस्के, प्रा.पी. एस. बनसोडे यांच्यासह विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.







**विनम्र**
**अभिवादन ...**

माझ्या मराठी मातीचा,
लावा ललाटास टिळा
हिच्या संगे जागतील,
मायदेशांतील शिळा

- कुसुमाग्रज




**कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त व संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक आदरणीय कर्मयोगी आप्पासाहेब काडादी यांच्या स्मृतिदिनानिमित्त संयुक्त अभिवादनाचा कार्यक्रम कॉलेजच्या प्रांगणात संपन्न झाला. याप्रसंगी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज आणि कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जीवन कार्याची माहिती मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुहास पुजारी यांनी विद्यार्थ्यांना दिली.**



# राष्ट्रीय स्तरावरील ललित कला अकादमी पुरस्कार विजेत्या तेजस्विनी नारायण सोनवणे यांचा संगमेश्वर मध्ये सत्कार

## आई-वडील आणि गुरूंचे पाठबळ अन मार्गदर्शन महत्त्वाचे - तेजस्विनी सोनवणे

सोलापूर (दिनांक १२) " कला क्षेत्रात काम करताना माझ्या आईवडिलांनी पाठबळ दिले आणि कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयातील गुरुंचे मार्गदर्शन लाभले म्हणून हा प्रवास मी करु शकले." असे उदगार तेजस्विनी सोनवणे यांनी काढले. ललित कला अकादमी दिल्ली च्या वतीने माननीय राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नुकताच त्यांचा रुपये दोन लाख, सन्मानपत्र देऊन सन्मान झाला. त्यानिमित्ताने संमेश्वर कॉलेजच्या वतीने त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, कला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील, माजी प्राचार्य मल्लिनाथ बिलगुंदी, प्रा. सचिन गायकवाड, प्रा. रेखा पटणे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी तेजस्विनीचे वडील नारायण सोनवणे म्हणाले की, " लहानपणापासून तेजस्विनी अत्यंत कष्टाळू आहे ती चित्रकलेत खूप रमते हे लक्षात आल्यावर तिचा श्वास आणि ध्यास फक्त चित्रकला झाली. आणि ती कलेच्या माध्यमातून पुढे यावी असे तिला वाटायला लागलं आणि तिला आम्ही फक्त तसे अनुभव देत गेलो."



ललित कला अकादमी दिल्ली च्या वतीने माननीय राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते रुपये दोन लाख, सन्मानपत्र देऊन तेजस्विनी सोनावणे यांचा सन्मान झाला. त्यानिमित्ताने संमेश्वर कॉलेजच्या वतीने सत्कार झाला या प्रसंगी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, तेजस्विनीचे आई - बाबा,तेजस्विनी सोनवणे,संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी,कै.अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मल्लिनाथ बिलगुंदी, चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील.

सचिव धर्मराज काडादी म्हणाले की, " तेजस्विनीने मिळवलेले हे यश समस्त सोलापूरकरांची मान उंचावणारे आहे. सोलापूरच्या कला वैभवात या राष्ट्रीय पुरस्काराची नक्कीच नोंद घेतली जाणार आहे. यापुढील काळात कर्मयोगी कै. अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालय वेगवेगळ्याउपक्रमाच्या माध्यमातून तेजस्विनी सोबत राहणार आहे. तिचे मार्गदर्शन पुढच्या पिढीला मिळावे हीच अपेक्षा त्यांच्या भावी वाटचालीस आमच्या शुभेच्छा." माजी प्राचार्य मल्लिनाथ बिलगुंदी यांनी तेजस्विनीचा कला प्रवास उलगडत , " जीवन अनुभवातून माणूस कलेकडे ओढला जातो. हे अनुभव आपल्याला पुढे उपयोगी पडतात." असं सांगितलं.प्रारंभी प्राचार्य दीपक पाटील यांनी प्रास्ताविक केलं. यात त्यांनी कॉलेजमध्ये असतानाच मिळालेले पुरस्कार याबद्दल उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यानंतर तेजस्विनीच्या आई-वडिलांसह संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कला महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.



ललित कला अकादमी दिल्ली च्या वतीने माननीय राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते रुपये दोन लाख, सन्मानपत्र देऊन तेजस्विनी सोनावणे यांचा सन्मान झाला. त्यानिमित्ताने संमेश्वर कॉलेजच्या वतीने सत्कार झाला या प्रसंगी प्राचार्य डॉ. शोभा राजमान्य, तेजस्विनीचे आई - बाबा,तेजस्विनी सोनवणे,संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी,कै.अप्पासाहेब काडादी चित्रकला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मल्लिनाथ बिलगुंदी, चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य दीपक पाटील. प्रा. सचिन गायकवाड, प्रा. रेखा पटणे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# संगमेश्वरमध्ये पदव्युत्तर विभागात व्याख्यान

## सुफी साहित्याची नोंद जागतिक स्तरावर आहे - अजीज नदाफ




**सोलापूर (दिनांक १४ )**

'' सुफी साहित्याची नोंद जागतिक स्तरावर आहे. सुफी पंथाने दर्जेदार साहित्याच्या माध्यमातून, पंथाच्या आचरणातून, त्यांचे अस्तित्व टिकून ठेवले आहे. सुफी आचरण आणि शर्यतमधील आचरण तत्वे समाजाला दिशा देणारे आहेत.'' असे प्रतिपादन प्राध्यापक डॉक्टर अजित नदाफ यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या 'भारतातील सुफी साहित्याची चळवळ ' या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. मंचावर प्राध्यापक डी. एम. मेत्री, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. राजशेखर येळीकर उपस्थित होते.

प्रारंभी कॉलेजच्या वतीने डॉक्टर येळीकर यांनी प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राध्यापक रेवणसिद्ध हालोळी यांनी करून दिली. त्यानंतर डॉक्टर नदाफ यांनी सुफी साहित्य आणि त्यांच्या पंथाचा उगम , विकास आणि सद्यस्थितीतील त्यांचे मूल्य याबद्दल सविस्तर विवेचन केले. त्यानंतर प्राध्यापक डी एम मेत्री यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी वैष्णवी कुलकर्णी यांनी केले, तर कुमारी खानसा मूच्छाले हिने आभार मानले. याप्रसंगी प्राध्यापक डॉ.महादेव कोरी , प्रा . मुस्तफा मकानदार यांच्यासह पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.





नवी दिल्ली : राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते सोलापूर येथील तेजस्वी नारायण सोनवणे हिचा ललित कला अकादमीच्या ६१ व्या वार्षिक सोहळ्यात बुधवारी तिने काढलेल्या चित्रासाठी पुरस्कार देण्यात आला.

**सौजन्य...**

**दैनिक संचार**

## रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा ...
## गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा...

**- गझलसम्राट, कविवर्य सुरेश भट**